जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे (ग्रामीण) यांचे कार्यालय,
पहिला मजला,महाराष्ट्र राज्य सहकारी संघ इमारत,५,बी.जे. रोड,पुणे ०१

दुरध्वनी क्र. ०२०- २६१२५७७९ email:- ddrpunegramin@gmail.com

जा.क्र.जिउनिग्रा/फेडरेशन सोसा सभासद संस्था वृध्दी /सन २०२५ /३८४९ दिनाक ०७/०२/२०२५

प्रति,
सहाय्यक निबंधक,
सहकारी संस्था, ता............जि. पुणे.

विषय :- महासंघाच्या सभासद वृद्धी उपक्रमासाठी प्रोत्साहन देणे बाबत...

**संदर्भ:- पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ मर्या यांचे दि.16/01/2025 रोजीचे पत्र.**

उपरोक्त संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

2/- उपरोक्त विषयांकित अर्जान्वये पुणे जिल्हा सह, गृहनिर्माणं संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्या. यांचे दि.२९.०८.२०२४ रोजीच्या पत्रानुसार पुणे जिल्ह्यातील एकूण संस्थांपैकी केवळ ५००० संस्था महासंघाच्या सभासद आहेत. उपविधी क्र.६ प्रमाणे प्रत्येक नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेने महासंघाचे सभासदत्व घेणे आवश्यक आहे. २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात जास्तीत जास्त संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घ्यावे यासाठी प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यांसाठी आम्ही सभासद वृद्धीउपक्रम राबवत आहोत. त्यासाठी काही व्यक्तीची मासिक मानधनासह नियुक्ती करत आहोत. तरी या उपक्रमासाठी आपण प्रोत्साहनपर व संस्थांना आवाहन करणारे पत्र द्यावे अशी विनंती केली आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते की, आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थाना सदस्यत्व घेतलेले नाही अश्या संस्थांनी महासंघाचे सदस्यत्व घेणेसाठी सभासदवृद्धी उपक्रमभाग घेण्यात यावा. तरी, आपल्या कार्यक्षेत्रातील उर्वरित सहकारी गृहनिर्माण संस्थांना महासंघाचे सदस्यत्व घेण्यासाठी विविध माध्यमांद्वारे प्रोत्साहन देणेचे अनुषंगाने संस्थांना आपल्या स्तरावरुन लेखी पत्राव्दारे कळविण्यात यावे.

(प्रकाश ल.जगताप)
जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, पुणे ग्रामीण

प्रत :
अध्यक्ष, श्री. सुहास पटवर्धन व सचिव सौ. मनीषा कोष्टी, पुणे जिल्हा सह. गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ मर्या. ३१३, नारायण पेठ, प्रभात प्रेस समोर, पुणे.

महाराष्ट्र शासन
सहकार,पणन व वस्त्रोद्योग विभाग
**उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणे शहर(४), पुणे यांचे कार्यालय,**
सहकार वैभव, पहिला मजला, प्लॉटई/३, मार्केटिंग फेडरेशन इमारत,पीडीसीसी बँक शेजारी,गुलटेकडी, मार्केटयार्ड, पुणे - ३७
**दुरध्वनी क्रमांक – ०२०-२४२६११९३** **ई-मेल आयडी - dyrcity४@gmail.com**

जा.क्र. उनि (४)/ गृह/पुणे जिल्हा सहकारी गृह संस्था व अपार्टमेंट/सन २०२५/६१० दिनांक -०६/०२/२०२५

**प्रति,**

अध्यक्ष/सचिव

------------------सहकारी गृहरचना संस्था मर्या.

**विषय : पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे सभासदत्व घेणेबाबत**

संदर्भ : - अध्यक्ष,पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ मर्या. यांचेकडील दि.२७/०१/२०२५ रोजीचे पत्र.

पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेट महासंघ पुणे जिल्हयात २५ हजार सहकारी गृहरचना संस्था आणि ३५ हजार अपार्टमेंन्ट चे प्रतिनिधित्व करतात. गेली ५० वर्षे पुणे जिल्हयातील सहकारी गृहरचना संस्था,अपार्टमेंटसना संस्था स्थापन करणेसंदर्भात मार्गदर्शन करणे,संस्थांचे प्रश्न शासन दरबारी मांडणे नियमांमध्ये संस्थांच्या हिताच्या दुरुस्त्या सुचविणे,संस्थांची थकबाकी वसुली कारवाई तसेच सभासद व कार्यकारिणी सदस्यांना प्रशिक्षण देणे ही कामे करतात.पुणे जिल्हयातील सुमारे ५००० हून अधिक सभासद संस्था सर्व विषयांवर मार्गदर्शनाचा लाभ घेत आहेत.

आदर्श उपविधी २०१४ क्र.६ नुसार संस्थेची नोंदणी झाल्यावर ताबडतोब ही संस्था त्या जिल्हयातील /प्रभागाच्या /तालुक्याच्या सहकारी गृहनिर्माण महासंघाची व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सभासद होईल व वर निर्दिष्ट केलेल्या त्या त्या संस्थांच्या उपविधीतील तरतुदीनुसार तिने भरावयाच्य सर्व रकमांचा वेळोवेळी भरणा करेल.

मात्र अद्याप अनेक संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतलेले नाही तरी महासंघाचे सभासदत्व घेऊन मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा व लेखापरीक्षणातील त्रुटीची पुर्तता करावी.

महासंघातर्फे २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमीत अनेक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. महासंघ सर्व नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस यांची माहिती संकलित करत आहे सोबत दिलेला google फॉर्म भरुण द्यावी.

**( डी. एस. हौसारे )**
उपनिबंधक
सहकारी संस्था, पुणे शहर (४),पुणे.

प्रत-

श्री सुहास पटवर्धन,अध्यक्ष,पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ मर्या.

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,जिल्हा
उपनिबंधक,सहकारी संस्था,पुणे शहर यांचे कार्यालय,
साखर संकुल शिवाजीनगर,पुणे -४११ ००५
दुरध्वनी : ०२०-२५५२२३१८ Email : ddrpunecity@gmail.com

जा.क्रं.जिडनिपुश/गृह/पुणेजि.सह.गृह.सं.वअपार्टमेंटमहासंघ/२०२५ /४५३७ दि. २२/०१/२०२५

प्रति,
उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर (१), (२), (३), (४), (५), (६)

**विषय :-** महासंघाच्या सभासद वृद्धी उपक्रमासाठी प्रोत्साहन देणे बाबत...

**संदर्भ:-** पुणे जिल्हा सह.गृहनिर्माण सं.आणि अपार्टमेंट महासंघ मर्या.यांचे दि.१६/०१/२०२५ रोजीचे पत्र

उपरोक्त संदर्भिय विषयाकडे आपले लक्ष वेधण्यात येत आहे.

२/- उपरोक्त विषयांकित अर्जान्वये पुणे जिल्हा सह. गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघ मर्या. यांचे दि.२९.०८.२०२४ रोजीच्या पत्रानुसार पुणे जिल्ह्यातील एकूण संस्थांपैकी केवळ ५००० संस्था महासंघाच्या सभासद आहेत. उपविधी क्र.६ प्रमाणे प्रत्येक नोंदणीकृत सहकारी गृहनिर्माण संस्थेने महासंघाचे सभासदत्व घेणे आवश्यक आहे. २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षात जास्तीत जास्त संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घ्यावे यासाठी प्रायोगिक तत्वावर तीन महिन्यांसाठी आम्ही सभासद वृद्धी उपक्रम राबवत आहोत. त्यासाठी काही व्यक्तीची मासिक मानधनासह नियुक्ती करत आहोत. तरी या उपक्रमासाठी आपण प्रोत्साहनपर व संस्थांना आवाहन करणारे पत्र द्यावे अशी विनंती केली आहे.

त्यानुषंगाने आपणास कळविण्यात येते कि आपल्या कार्यक्षेत्रातील ज्या सहकारी गृहनिर्माण संस्थांनी सदस्यत्व घेतलेले नाही अश्या संस्थांनी महासंघाचे सदस्यत्व घेणेसाठी तीन महिन्यांमध्ये सभासद वृद्धी उपक्रमभाग घेण्यात यावा . तरी, आपल्या कार्यक्षेत्रातील उर्वरित सहकारी गृहनिर्माण संस्थांना महासंघाचे सदस्यत्व घेण्यासाठी विविध माध्यमांद्वारे प्रोत्साहन देणेचे अनुषंगाने संस्थांना आपल्या स्तरावरून लेखी पत्राद्वारे कळविण्यात यावे.

(संजय राऊत)
जिल्हा उपनिबंधक,
सहकारी संस्था, पुणे शहर,पुणे

प्रत:-
अध्यक्ष श्री.सुहास पटवर्धन व सचिव सौ.मनीषा कोष्टी ,पुणे जिल्हा सह.गृहनिर्माण सं.आणि अपार्टमेंट महासंघ मर्या.३१३ नारायण पेठ, प्रभास प्रेस समोर, पुणे
३/- यांनी कृपया सबंधित उपनिबंधक कार्यालयाशी संपर्क साधावा.

**महाराष्ट्र शासन**
**सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग**
**उपनिबंधक, सहकारी संस्था, पुणेशहर (२), पुणे**
टिळक रोड, क्षेत्रीय कार्यालय, दुसरा मजला, पुणे

जाक्र. उनि (2)/गृह/जिल्हा सहकारी गृह संस्था वपुससन २०२५/२७२५ दिनांक १४/०२/२०२५

प्रति,
अध्यक्ष/सचिव
-----------------------------------सहकारी गृहरचना संस्था मर्या.
------------------------------------------------------------------

**विषय : पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंट महासंघाचे सभासदत्व घेणेबाबत.**
संदर्भ : अध्यक्ष, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ मर्या. यांचेकडील दि.२७/०१/२०२५ रोजीचे पत्र.

पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेट महासंघ पुणे जिल्हयात २५ हजार सहकारी गृहरचना संस्था आणि ३५ हजार अपार्टमेन्ट चे प्रतिनिधित्व करतात. गेली ५० वर्षे पुणे जिल्हयातील सहकारी गृहरचना संस्था, अपार्टमेंटसना संस्था स्थापन करणेसंदर्भात मार्गदर्शन करणे, संस्थांचे प्रश्न शासन दरबारी मांडणे नियमांमध्ये संस्थांच्या हिताच्या दुरुस्त्या सुचविणे, संस्थांची थकबाकी वसुली कारवाई तसेच सभासद व कार्यकारिणी सदस्यांना प्रशिक्षण देणे ही कामे करतात. पुणे जिल्हयातील सुमारे ५००० हून अधिक सभासद संस्था सर्व विषयांवर मार्गदर्शनाचा लाभ घेत आहेत.

आदर्श उपविधी २०१४ क्र.६ नुसार संस्थेची नोंदणी झाल्यावर ताबडतोब ही संस्था त्या जिल्हयातील /प्रभागाच्या / तालुक्याच्या सहकारी गृहनिर्माण महासंघाची व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची सभासद होईल व वर निर्दिष्ट केलेल्या त्या त्या संस्थांच्या उपविधीतील तरतुदीनुसार तिने भरावयाच्य सर्व रकमांचा वेळोवेळी भरणा करेल.

मात्र अद्याप अनेक संस्थांनी महासंघाचे सभासदत्व घेतलेले नाही तरी महासंघाचे सभासदत्व घेऊन मार्गदर्शनाचा लाभ घ्यावा व लेखापरीक्षणातील त्रुटीची पुर्तता करावी.

महासंघातर्फे २०२५ या आंतरराष्ट्रीय सहकार वर्षानिमीत्त अनेक उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. महासंघ सर्व नोंदणीकृत गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस यांची माहिती संकलित करत आहे सोबत दिलेला google फॉर्म भरुण द्यावी.

(निलम पिंगळे)
उपनिबंधक,
सहकारी संस्था,पुणेशहर (२), पुणे

प्रत-
श्री सुहास पटवर्धन, अध्यक्ष, पुणे जिल्हा सहकारी गृहनिर्माण संस्था आणि अपार्टमेंटस महासंघ मर्या.